पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/३/कावि/५२१/२०१९
दिनांक - २४/०५/२०१९

प्रति,


मा........................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा दिनांक – **२९/०५/२०१९** रोजी आयोजित केले बाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा **बुधवार**, दिनांक **२९/०५/२०१९** रोजी दुपारी **२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १२१**

**दिनांक - २९/०५/२०१९** **वेळ – दुपारी ०२.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा **बुधवार,** दिनांक **२९/०५/२०१९** रोजी दुपारी **०२.०० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत विकसीत होणा-या काळेवाडी फाटा ते देहू – आळंदी रस्ता या ४५.०० मी. रुंद रस्ता हा एमआयडीसी हद्दीमधील मे.इंडोलिंक व युरोसिटी इंडस्ट्रियल प्रिमायसेस को.ऑ.सो. लि.कंपन्याच्या जागे व्यतिरिक्त बहूतांश सर्व जागेवर रस्ता विकसीत झालेला असल्याने व फक्त कंपनीच्या जागेवरिल रस्ता विकसीत झालेला नसल्याने सदर कंपन्यांशी चर्चा करुन सदर कंपन्याचे जागेवरिल बांधकामाची नुकसान भरपाई देण्याचे निश्चित करण्यात आले. तथापी मे. इंडोलिंक व युरोसिटी इंडस्ट्रियल प्रिमायसेस को.ऑ.सो.लि. सोसायटीच्या अध्यक्ष व सेक्रेटरी यांनी मे.इंडोलिंक व युरोसिटी इंडस्ट्रियल प्रिमायसेस को.ऑ.सो.लि. सोसायटी यांना त्यांचे बांधकामासाठी र.रु.६,२५,००,०००/- (अक्षरी र.रु. सहा कोटी पंचवीस लाख फक्त ) ही सन २०१४ मधिल असल्याने आता सन २०१९ पर्यंतची वाढ विचारात घेऊन सदर बांधकामासाठीचे एकुण मुल्यांकन र.रु.७,५०,००,०००/- (अक्षरी र.रु.सात कोटी पन्नास लाख फक्त ) मिळणेची मागणी केलेली होती. त्यास अनुसरुन मा.आयुक्त यांचेकडे दिनांक १०/०४/२०१९ रोजी बैठक संपन्न झाली त्यामध्ये सध्यस्थितीत लोकसभेच्या सार्वजनिक निवडणूका सुरु असल्याने आदर्श आचारसंहिता लागू आहे त्यामुळे कोणतेही धोरणात्मक निर्णय घेता येत नाहीत. तथापी मा.महापालिका सभेने मंजूर केलेल्या रक्कमेवर सन २०१४ ते सन २०१९ पर्यंतच्या ५ वर्षे कालावधीसाठी वाढीव र.रु.७५,००,०००/- (अक्षरी र.रु. पच्याहत्तर लाख फक्त ) सह एकुण र.रु.७,००,००,०००/- (अक्षरी र.रु.सात कोटी फक्त ) इतकी सुधारित रक्कम आदर्श आचारसंहिता संपल्यानंतर मा. महापालिका सभा व मा. स्थायी समिती सभेच्या मान्यता प्राप्त झाल्यानंतर देता येईल असा निर्णय झालेला आहे. मे. इंडोलिंक व युरोसिटी इंडस्ट्रियल प्रिमायसेस को.ऑ.सो.लि. सोसायटीच्या अध्यक्ष व सेक्रेटरी यांनी मा.आयुक्त यांचेकडे दिनांक १०/०४/२०१९ रोजी बैठकीमध्ये निश्चित केलेली बांधकामासाठीच्या नुकसान भरपाईची एकुण र.रु.७,००,००,०००/- ( अक्षरी र.रु.सात कोटी

फक्त ) मान्य असलेचे महानगरपालिकेस कळविलेले आहे. त्यास अनुसरुन विषयांकित मे.इंडोलिंक व युरोसिटी इंडस्ट्रियल प्रिमायसेस को.ऑ.सो.लि.सोसायटीच्या जागेतून जाणा-या महानगरपालिकेच्या सुधारित मंजूर विकास योजनेतील ४५ मी. रुंद रस्त्याच्या जागेच्या संपादना अंतर्गत कंपन्यांच्या बांधीव इमारतीसाठी एकुण सुधारित र.रु.७,००,००,०००/- (अक्षरी र.रु.सात कोटी फक्त) तसेच सदर व्यवहारात होणारे अदलाबदल रस्ता बाधित क्षेत्र २२५० चौ.मी. ( लांबी- ५० मी. X रुंदी - ४५ मी. ) क्षेत्राबाबतचे दस्त ( deed of exchange ) नोंदणी करणेकामी लागणारी आवश्यक स्टँप ड्युटी व नोंदणी शुल्क यासाठीच्या खर्चासाठीचे सुधारित विषयपत्रास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२) मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयामधील दरमहा एकत्रीत मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात सहा महिनेकरीता वेळोवेळी नेमणुक केलेल्या विविध कन्सलटंट पदावरील उमेदवारांची मुदत दि.२८/०५/२०१९ रोजी संपुष्टात येत आहे. सध्यस्थितीत लोकसभा निवडणुक २०१९ ची आचारसंहिता कालावधी लागू असून नव्याने जाहिरात प्रकटन प्रसिध्द करून भरती प्रक्रिया राबविणे शक्य नसल्याने सध्यस्थितीत कार्यरत असलेल्या व रूग्णालयास आवश्यकता असलेल्या विविध कन्सलटंट पदावरील प्रस्तावात नमुद ११ उमेदवारांना पुढील तीन महिनेकरीता मुदतवाढीस व त्याकामी प्रस्तावात नमुद प्रमाणे येणा-या एकूण र.रु.१७,८५,०००/-(अक्षरी र.रु.सतरा लाख पंच्याऐंशी हजार फक्त) खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३) इ क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत सन २०१८-१९ मध्ये सर्व्हे नं.१ मधील खेळाच्या मैदानासाठी प्रेक्षक गॅलरी उभारणे या कामास अंदापत्रकीय र.रु.१५,००,००,०००/- महापालिका सभा समिती ठराव क्र.१८७ दि.२०/०४/२०१८ अन्वये एकत्रीत अंदाजपत्रका अंतर्गत प्रशासकीय मान्यता देणेत आलेली आहे. सदरचे काम तांत्रिकदृष्टया वैशिष्टय पुर्ण असल्याने कामावर देखरेख करणेकरीता प्रस्तुत कामासाठी निविदा पश्चात (**Post tender Activity)** सल्लागार नेमणुकी कामी दि.२९/११/२०१८ रोजी दर पत्रके मागविलेली आहेत. सदर दर पत्रकामध्ये मे.नियोजन कन्स्टल्टंट यांचा लघुत्तम दर १.४९% एवढा आहे. तांत्रिकदृष्टया आराखडयाप्रमाणे काम करुन घेणे, प्रकल्पाच्या दैनंदिन कामावर देखरेख करणे. निविदा निर्देशानुसार गुणवत्ता तपासणी करणे इ. निविदा पश्चात कामे आवश्यक आहे. त्यांनी यापुर्वी देखील अशा प्रकारची कामे केलेली आहेत व सध्या काही कामे प्रगतीपथावर आहेत. सबब कोटेशन नुसार प्राप्त झालेल्या दरानुसार सदर कामाकरीता एकूण १.४९% (निविदापश्चात) या दराने फी अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.४) नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूद प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.५) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.82/01/2018-2019 अन्वये चिखली से.क्र.17 व 19 येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीच्या (EWS) गृहप्रकल्पातील नविन मंजूर १५ इमारतींकरीता पेव्हींग ब्लॉक, स्थापत्य विषयक कामे करणे कामी मे.अरबाज इंजिनिअरिंग आणि सिव्हील कन्स्ट्रक्शन नि.र.रू.42,09,942/- (अक्षरी र.रु.बेचाळीस लाख नऊ हजार नऊशे बेचाळीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.39,77,130/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.39,77,130/- पेक्षा 19.12% कमी म्हणजेच र.रु.32,16,703 /- + रॉयल्टी चार्जेस र.रु.1,86,712/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.46100/- = एकुण र.रु.34,49,515 /- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.६) मुख्य लेखा परिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरी कामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार सोबतचे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेबाबत विचार करणे.



**(उल्हास बबनराव जगताप)**

**नगरसचिव**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,

क्रमांक - नस/३/कावि/५२१/२०१९

दिनांक – २४/०५/२०१९

**टिप -** प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.